# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२२ दिनांक:१० ऑगस्ट, २०२२

---

जळगाव, दि. १० ( ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या बहि:स्थ विभागाव्दारे ११ ऑगस्ट या नामविस्तार दिनापासून " कवयित्री बहिणाबाई : जीवन आणि काव्य " प्रमाणपत्र अभ्यासक्रमासाठी ऑनलाईन प्रवेशाला प्रारंभ होत आहे.

विद्यापीठाला कवयित्री बहिणाबाई चौधरी यांचे नाव चार वर्षापूर्वी देण्यात आले. बहिणाबाईंच्या काव्याची ओळख नव्याने विद्यार्थ्यांना व्हावी. त्यांचे मराठी साहित्यातील भरीव योगदान तळागाळातील घटकांना परिचित व्हावे यासाठी कुलगुरु प्रा.व्ही.एल.माहेश्वरी यांच्या मार्गदर्शनाखाली हा नवा प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरु केला जात आहे. घरी बसून ऑनलाईन पध्दतीने हा अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना शिकता येणार आहे. यातून बहिणाबाईंचे जीवन आणि काव्याचा परिचय होईल. फक्त ३० तासांचा आणि किमान १५ दिवसात हा शिक्षणक्रम पूर्ण करता येईल. आठवडयातून शनिवार आणि रविवार असे दोन दिवस एक तास ऑनलाईन वर्ग होणार असून तज्ज्ञ आणि अनुभवी प्राध्यापक मार्गदर्शन करतील. ऑनलाईन प्रवेशाला उद्या गुरुवार पासून प्रारंभ होणार आहे. अधिक माहितीसाठी www.nmu.ac.in / ideal येथे क्लिक करावे अथवा २२५७४९५/४९६ या क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन बहि:स्थ विभागाचे प्रभारी संचालक प्रा.आशुतोष पाटील यांनी केले आहे.

## बातमी क्र.२

जळगाव, दि. ८ ( ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या चौथ्या नामविस्तार दिनानिमित्त गुरुवार, दि.११ ऑगस्ट रोजी विद्यापीठात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

विद्यापीठाच्या अधिसभा सभागृहात सकाळी १० वाजता हा कार्यक्रम होणार आहे. प्रमुख पाहुणे म्हणून विद्यापीठाचे माजी कुलगुरु प्रा.आर.एस.माळी उपस्थित राहणार असून अध्यक्षस्थानी कुलगुरु प्रा.व्ही.एल. माहेश्वरी राहतील. यावेळी सन्माननीय अतिथी म्हणून मुंबई विद्यापीठाचे माजी कुलगुरु प्रा.विजय खोले व मुंबई विद्यापीठाचे प्र-कुलगुरु प्रा.आर.डी.कुलकर्णी उपस्थित राहतील. प्र-कुलगुरु प्रा.एस.टी. इंगळे देखील यावेळी हजर राहणार असून या समारंभात विद्यापीठाच्या नूतन संकेतस्थळाचे लोकार्पण होणार आहे अशी माहिती प्रभारी कुलसचिव प्रा.किशोर पवार यांनी दिली.

---

---

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी